# कृषि तंत्र विद्यालय

(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला)
सेलसुरा तह. देवळी जि. वर्धा (महा.)

डॉ. जीवन कतोरे
प्राचार्य

atsselsura@gmail.com

जा.क. कृतंवि / प्रक्षेत्र /०९ B/ २०२६ दिनांक : ०८/०४/२०२६

## निविदा

प्रति,

..................................................,

..................................................

विषय : प्रक्षेत्रावर जेसीबी व्दारे कामे करण्याचे दर पुरविणेबाबत.......

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथिल **प्रक्षेत्रावर जेसीबी व्दारे काम करावयाचे आहे.** त्याकरीता आपणांकडून लिफाफा बंद दरनिविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | विवरण | दर प्रति तास (सर्व करा सहीत) |
|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रावर जेसीबीव्दारे कामे करण्याचे दर | रु........................ |

नियम व अटी :

१. सिलबंद निवीदा या कार्यालयात दि. **१५/०४/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचवयास पाहीजे. उशीरा निवीदा पोहचल्यास त्या निवीदांचा विचार करण्यात येणार नाही.
२. लिफाफ्यावर निवीदा... **जेसीबी काम करण्याचे दर पुरविणेबाबत**... असा उल्लेख करावा.
३. अधिकृत असलेल्या पुरवठादारांनीच निविदा पाठवाव्या.
४. निवीदा प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा, यवतमाळ रोड, जि. वर्धा या पत्त्यावर आणुन द्यावा किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात याव्या.
५. निवीदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा यांचे कडे राखून ठेवलेला आहे.
६. काम समाधानकारक झाले नसल्यास, सदर काम पून्हा करुन द्यावे लागेल. व्यवस्थित काम न केल्यास त्याबाबतचा मोबदला दिला जाणार नाही.
७. जेसीबीव्दारे काम सुरु असतांना, जेसीबी नादुरुस्त झाल्यास दुसरी व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याकरीता कोणताही वेगळा मोबदला मिळणार नाही.
८. जेसीबी वाहनचालकाचा मोबदला व डीझेल याकरीता कोणताही वेगळा मोबदला मिळणार नाही.
९. काम करीत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान, जिवीत हानी अथवा अपघात झाल्यास हे कार्यालय, विद्यापीठ अथवा संबधित अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
१०. काम करीत असतांना प्रक्षेत्रावर विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी. नुकसान झाल्यास मालकास जबाबदार धरण्यात येवून नुकसान भरपाई करण्यात येईल.
११. दरपत्रक सादर करतांना दरांचा सर्व कर व सेवा शुल्कसहीत स्पष्ट उल्लेख करावा- नमुद केलेल्या दरा व्यतीरीक्त इंधन, दुरूस्ती व साहीत्य व तुट फूट सुधार करण्यास कोणतेही शुल्क अदा केल्या जाणार नाही. खोडतोड असलेले दरपत्रक स्विकारल्या जाणार नाही व तसे दरपत्रक रद्द करण्यात येईल.
१२. काम समाधानकारक व पूर्ण झाल्यावर देयकाची संपूर्ण प्रक्रिया झाल्यावरच देयक खर्च अदा करण्यात येईल.
१३. चालक हा विहीत परवानाधारकच असावा.
१४. आपण पूरवित असलेले सर्व कामांचे दर हे आर्थिक वर्ष २०२६–२०२७ दरम्यान वैध राहतील. मध्यंतरीच्या कालावधित कोणत्याही प्रकारची माहागाई व दरांमध्ये ईतर कोणतेही बदल झाल्यास सादर केलेल्या दरांमध्ये बदल करता येणार नाही.
१५. आपण करीत असलेले काम हे पूर्णतः अस्थाई स्वरूपाचे असेल या बावत कोणताही स्थाई स्वरूपाचा दावा करता येणार नाही.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असलेल्या पुरवठादारानेच निविदा सादर कराव्यात.

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय,
सेलसुरा जि. वर्धा